# सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

पनवेल (प्रतिनिधी) नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १ जानेवारी २०१५ रोजी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नविन पनवेल येथील सी.के.टी.इंग्रजी माध्यमिक विभागाचा वार्षिक पारितोषिक वितरण शानदार समारंभाने पार पडला. या समारंभास पनवेल येथील प्रतिथयश डॉक्टर आशिष गांधी आणि पनवेलच्या नगराध्यक्षा चारूशीला घरत यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून सदैव प्रयत्नशील असलेल्या या विद्यालयात वर्षभर अनेक वेगवेगळया स्पर्धांचे आयोजन केले गेले. यामध्ये राखी बनवणे, ग्रिटींग कार्ड तयार करणे, वक्तृत्व स्पर्धा, सॅलड मेकिंग,फुलांची सजावट, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तु बनवणे, देशभक्तिपर गीत गायन अशा अनेक स्पर्धांचा समावेश होता.

क्रीडा प्रकारात कुस्ती, ज्युडो, मैदानी स्पर्धा, कराटे, बॉक्सिंग यांच्या तालुका व जिल्हास्तरीय स्पर्धांचे विजेते आणि शालेय क्रिडा स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिक देऊन आणि सुवर्ण, रौप्य आणि कास्य पदकांनी सन्मानित करण्यात आले. तसेच विविध वर्गातील शैक्षणिक प्रगती, शालाबाहय स्पर्धा परिक्षांतील यशाबद्दल विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले.

डॉ.आशिष गांधी यांनी मुलांना सतत प्रयत्नशील राहिलात तर कधीना कधी यश हे तुमचेच असेल, म्हणून सर्व स्पर्धांमधे भाग घेत रहा असे सांगितले. तसेच आज मुलांच्या चेहे-यावर दिसणारा आनंद हा नेहमीच दिसला पाहिजे म्हणून प्रत्येक गोष्टीतला आनंद घेत चला असे आवर्जुन सांगितले. चारूशिला घरत यांनी सर्व विजेत्यांबरोबरच बक्षिस न मिळालेल्या स्पर्धकांचे ही मनापासून कौतुक केले. तर विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी आपल्या प्रास्ताविकात स्वप्नांची पूर्ती ही काही जादु नव्हे तर त्यासाठी सतत प्रयत्यशील राहिलं पाहिजे, हा गुरूमंत्र विद्यार्थ्यांना दिला.यावेळी पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष प्रदिप नायर, सहसचिव सोनल तिवटणे तसेच सीकेटी विद्यालयाच्या इतर विभागांचे प्रमुख उपस्थित होते.